**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर पिन.४२३१०९
फोन नं. (०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०
(Website www.sai.org.in , E-mail – purchase@sai.org.in)

## जाहीर फेर ई-निविदा (दुस-यांदा)

श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती कॅन्टीन विभागांसाठी सन २०१९-२० करीता (ऑगस्ट २०१९ ते मार्च २०२०) हिरवी विलायची खरेदीकामी पुरवठाधारक,वितरक यांचेकडून फेर ई-निविदा ऑनलाईन मागविण्यात येत आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

१. ई-निविदा व ई-निविदेबाबतच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींग व अपलोडींगसाठी दि.२२/८/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.०७/०९/२०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

३. निविदा फी रु. १५,०००/- व बयाणा रक्कम रु. १,५०,०००/- शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

४. दि.०९/०९/२०१९ ते दि.१०/०९/२०१९ या कालावधीत सायं.०५.०० वाजेपर्यंत (रविवार खेरीज) निविदेमध्ये दर भरलेल्या हिरवी विलायचीचा नमुना शिर्डी येथील खरेदी विभागाचे कार्यालयात जमा करावेत.

५. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि.११/०९/२०१९ रोजी उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा अंशत:/पुर्णपणे स्वीकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

( दीपक मुगळीकर, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**शिरडी ४२३ १०९.**

**तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर**

---

दुरध्वनी क्रमांक (९१-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,

फॅक्स क्रमांक +९१-०२४२३-२५८८७०

Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.purchase@sai.org.in

---

**मुंबई कार्यालय** - साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर

मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३


---

## सन २०१९-२०

## (माहे ऑगस्ट-२०१९ ते मार्च-२०२० अखेर)

## श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती व कॅन्टीन विभागांसाठी हिरवी विलायची पुरविणेबाबत फेर ई-निविदा (दुस-यांदा)

**A. निविदेचा तपशिल- श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती, व कॅन्टीन विभागांसाठी हिरवी विलायची पुरविणेबाबत ई-निविदा**

**B. <u>ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष वगैरे तपशील खालीलप्रमाणे-</u>**

१. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अदयावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ तत्सम शासकीय परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

२. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

३. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने FSSAI परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

४. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

५. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या फर्मची सन २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८ या ३ आर्थिक वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल नमुद असणारे दिलेल्या नमुन्याप्रमाणे सी.ए यांचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

६. निविदाधारकाची वरील नमुद ३ आर्थिक वर्षाची किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम रू.३२,००,०००/- असणे अनिवार्य राहिल.

**C. <u>निविदाधारकाने हिरवी विलायचीचा नमुना सादर करण्याची पध्दत-</u>**

१. निविदाधारकाने निविदा भरलेले हिरवी विलायची २५० ग्रॅम वजनाचा नमुना स्वतंत्र कापडी पिशवीमध्ये सिलबंद करून संस्थानच्या खरेदी विभागामध्ये विहित मुदतीत जमा करणे अनिवार्य राहिल. कापडी पिशवीवर मालाचे नांव/प्रकार तसेच आपले फर्मचे नांव लिहिलेले असावे. दिलेले नमुने कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाहीत अगर बदलता येणार नाहीत.

२. हिरवी विलायचीचा उच्चतम दर्जाचा एकच नमुना सादर करावा. दोन किंवा अधिक नमुने सादर करू नये. तसे केल्यास एकाच नमुन्याचा विचार केला जाईल.

३. निविदाधारकाने हिरवी विलायचीचा नमुना देतांना नमुना निवडीसाठी असा नमुना द्यावा की पुरवठा आदेश मिळालेनंतर त्याच मालाचा संस्थानला पुरवठा होईल.

**D. <u>पुरवठा करावयाच्या साहित्याचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम-</u>**

१. पुरवठा करावयाचा साहित्याचा तपशिल BOQ मध्ये दिलेला आहे. त्यात ऑनलाईन दर नमूद करून निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

२. निविदा फी रक्कम रु.१५,०००/- व बयाणा रक्कम रु. १,५०,०००/- मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

**E. <u>निविदाधारकांसाठी सुचना-</u>**

१. सदर निविदा दि. 22/ 0८ /२०१९ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि. ०७/ ०९ /२०१९ सायं. ०५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

२. ई-निविदा भरलेल्या हिरवी विलायचीचे नमुना दि. ०९/ ०९ /२०१९ ते दि. १०/ ०९/२०१९ अखेर सायं. ५.०० वाजेपर्यंत (रविवार खेरीज) संस्थानचे शिर्डी येथील खरेदी विभागाचे कार्यालयात जमा करावेत.

३. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

४. शक्य झाल्यास दि. ११ / ०६ /२०१९ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. निविदेसोबत Online सादर केलेली कागदपत्रे मागणीप्रमाणे असल्यासच Commercial Bid उघडणेत येईल अन्यथा निविदा विचारात घेतली जाणार नाही.

५. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमध्ये सादर करावेत म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

६. नमुना नसलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही.

## F. निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-

१. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना GST, TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर तसेच मार्केट शेअर्स,मापाई, पॅकिंग व फॉरवर्डिग खर्च, जकात, वाहतूक, वाराई वगैरे सर्व खर्चासह शिर्डी संस्थानचे भांडार विभागामध्ये पोहोचचे दर या सर्व बाबींचा विचार करूनच दर भरावेत.

२. शासन नियमानुसार वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची आधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे

## G. ऑनलाईन निविदा उघडण्याची व नमुने निवडण्याची कार्यपध्दती-

१. निविदेचा Download कालावधी संपल्यानंतर खरेदी समितीचे सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथम उघडण्यात येतील. तसेच तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी सादर केलेल्या विलायचीचे नमुने तज्ञ समितीमार्फत निवडण्यात येतील.

२. नमुने निवडून अंतिम झालेनंतर कमर्शिअल बीड उघडण्यात येऊन नमुने निवड झालेल्या निविदाधारकांच्या दरांचा तुलनात्मक दृष्टया विचार करण्यात येईल व यामध्ये न्युनतम दरधारकांशी चर्चा व वाटाघाटी करण्यात येतील व त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.

## H. साहित्य पुरवठा करावयाचे ठिकाण-

१. निविदेत नमूद केलेल्या हिरवी विलायचीचा पुरवठा शिर्डी येथील संस्थानचे मुख्य भांडार विभागामध्ये करावा लागेल. प्रसंगी लाडू, प्रसादालय विभाग याठिकाणीही पुरवठा करावा लागेल.

## I. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-

१. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत हिरवी विलायचीचा पुरवठा करावयाची हमी म्हणून मंजुर मालाच्या एकुण रक्कमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर त्वरीत सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या सदर साहित्याचा पुरवठा केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर व्याज मिळणार नाही.

२. निविदा मंजुर झालेनंतर ३% सुरक्षा अनामत रक्कम त्वरित डी.डी.व्दारे/रोखीने भरावी लागेल. तसेच शिर्डी येथे समक्ष येऊन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास आदा करावी लागेल.

## J. मालाचा पुरवठा करण्याची मुदत -

१. हिरवी विलायची पुरवठा करण्याचा कालावधी १ ऑगस्ट २०१९ ते ३१ मार्च २०२० असा राहिल.

२. हिरवी विलायची पुरविणेचा आदेश दुरध्वनीवरुन अथवा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर चलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसात पुरवठा करावा लागेल.

३. शिर्डी येथे दर्शनासाठी भेट देणा-या साईभक्तांच्या गर्दीवर हि सेवा अवलंबुन असलेमुळे प्रत्येक महिन्यात/अगर कमी जास्त मुदतीत अगर संस्थानचे धोरणानुसार गरजेप्रमाणे हिरवी विलायचीची मागणी केली जाईल. एकदम सर्व विलायची घेतली जाणार नाही. संस्थानचे खरेदी चलनाप्रमाणे वेळोवेळी विलायची पुरवावी लागेल. तसेच मागणीपेक्षा जादा आलेली विलायची स्विकारली जाणार नाही.

४. संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधीत अगर त्यानंतरही पुढील वर्षाची खरेदी संबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आवश्यकतेनुसार मंजुर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा विलायचीची मागणी संस्थानकडून झाल्यास तीचा पुरवठा मान्य दरानेच करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. तसेच पुरवठा आदेशामध्ये नमुद केलेला सर्व विलायची घेणे, संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

## K. मालाचा स्वीकार करण्याची पध्दत-

१. पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणेच हिरवी विलायचीचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच बिल सादर करावे.

२. हिरवी विलायची मान्य झालेल्या दर्जाची व जातीची पुरवावी लागेल. कमी दर्जाची, वेगळ्या प्रकारची अगर जातीची किंवा खराब असल्यास ती स्विकारली जाणार नाही. असा विलायचीचा पुरवठा झाल्यास तो स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. ती न नेल्यास विलायचीची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

३. पुरवठाधारकाला पुरवठा आदेश दिलेनंतर पुरवठाधारकाने निविदेसोबत सादर केलेले व संस्थानचे तज्ञ समितीने निवडलेल्या नमुन्याप्रमाणेच विलायची पुरवणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहिल.

४. पुरवठा आदेशाप्रमाणे संस्थानकडे विलायची पाठविल्यानंतर संस्थानने विहीत केलेले यंत्रणेकडून तीची तपासणी केली जाईल. त्यांना योग्य वाटल्यास ती स्विकारण्यात येईल.

५. पुरवठा करीत असलेल्या विलायचीची Quantity जास्त असल्यामुळे, संस्थानकडून Randomly Sample घेऊन ती स्विकारली जाते. तथापी ती स्विकारलेनंतरही एखादा लॉट, गोणी अगर काही खराब विलायची आढळल्यास ती स्वखर्चाने बदलून द्यावी लागेल.

६. माल पुरवितांना FSSAI कायदयातील तरतुदीनुसार मालाच्या गोणीवर Date of Packing, Weight and Best Before Date चा स्पष्ट उल्लेख असावा.

८. मालाचे पॅकिंगसाठी वापरण्यात येणारे मटेरीअल Food grade Quality चे असावे.

१०. पुरविलेला विलायचीच्या गोणीचे वजन वगळता येणारे वजन विचारात घेतले जाईल.



९/१२

## L. लॅब तपासणीची कार्यपध्दती-

१. पुरविलेल्या विलायचीची गरजेनुसार संस्थान प्रयोगशाळा/जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा/ NABL/केंद्र शासनाच्या/राज्यशासनाच्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करणेत येईल.

२. संस्थानने करुन घेतलेले लॅब तपासणीमध्ये पुरविलेल्या विलायचीचे रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास सदर विलायची बदलून द्यावी लागेल. त्यादरम्यान संस्थानला बाहेरुन विलायची विकत घ्यावी लागल्यास जादा आलेल्या खर्चाची रक्कम अधिक पुरविलेला विलायचीच्या किंमतीच्या २ ते ५ टक्के दंड देय असलेल्या बील रकमेतून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

३. काही वेळेस लॅब रिपोर्ट येण्यासाठी विलंब होतो अशा वेळी जर आलेली विलायची वापरली गेली व नंतर लॅब रिपोर्ट FSSAI Standard प्रमाणे न आल्यास त्या लॉटमधील विलायचीच्या किंमतीच्या २ ते ५ टक्केपर्यंत दंड आकारला जाईल.

४. पुरविलेल्या विलायचीचा लॅब रिपोर्ट सलग तीन वेळेस FSSAI Standards नुसार न आलेस सदर निविदाधारकांस संस्थानकडून उचित कारवाई करणेबाबत निर्णय घेतला जाईल. याबाबत तक्रारदाराची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

५. संस्थान लॅबचा रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास केंद्र शासनाच्या मुंबई येथील शासकीय/NABL लॅबमध्ये भांडार विभागाकडून तेच सॅम्पल तपासणी करुन त्याची पुर्न खात्री करण्यात येईल. सदर लॅबचा तपासणी अहवाल अंतिम समजन्यात येईल.

## M बील आदा करण्याची पध्दती-

१. पुरविलेल्या विलायचीचे बिल तपासणी करुन, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच आदा करणेत येईल. विलायचीच्या पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२. हिरवी विलायचीचे तपासणी करुन ताब्यात घेतलेल्या विलायचीचे बील संस्थानकडे सादर केलेपासून ३० दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला आदा करण्याचा प्रयत्न राहिल.

३. निविदाधारकाने पुरविलेली विलायची संस्थानने नाकारली व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून विलायची खेरेदी करावी लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर मालाच्या बिलातुन वसुल केली जाईल.

४. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या कर कपाती बिलातून करण्यात येतील.

## N. आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-

१. पुरवठा आदेशातील हिरवी विलायची मुदतीत पुरविली नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या हिरवी विलायचीची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत ज्यस्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या हिरवी विलायचीची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२. विलायची पुरविणेचा आदेश दुरध्वनीवरुन अथवा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर चलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसांचे आत पुरवठा न झाल्यास, अगर योग्य प्रतीची नसल्यामुळे ती नाकारली गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितका किंवा दिलेल्या आदेशा इतकी विलायची दुसरीकडून खेरेदी करण्याची मुभा राहील. अशा खेरेदी केलेल्या विलायचीसाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई निविदाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

३. निविदेतील मंजुर दराने व निवडलेल्या नमुन्याप्रमाणे विलायचीचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही. अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने विलायचीचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा विलायचीचा पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन विलायची खरेदी करावी लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल.

४. निविदा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक मालाचा पुरवठा करु शकला नाही व तसे निविदाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल.

## O निविदा वैधता कालावधी-

१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी Technical Bid उघडल्यानंतर १२० दिवसांचा राहील.

## P. सर्व साधारण अटी शर्ती

१. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्पयावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२. पुरवठादाराचे/ संस्थेचे आवश्यकता वाटल्यास Vendor Audit केले जाईल.

३. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

४. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात माल पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या मालाच्या ५० टक्के मालाचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण मालाचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

५. कोणतीही निविदा अंशतः/पुर्णतः स्विकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे

६. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

७. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

(दीपक मुगळीकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

...५...

# निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ------------------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ------------------------------------------------------------

ऑफीस- ------------------------------------------------------------

दुकान- ------------------------------------------------------------

निवास- ------------------------------------------------------------

मोबाईल नंबर- ------------------------------------------------------------

फॅक्स नंबर- ------------------------------------------------------------

ई –मेल ------------------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ------------------------------------------------------------

दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- ------------------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे १. ------------------------------------------------------------

२. ------------------------------------------------------------

६. बॅंक खाते नांव १.------------------------------------------------------------

शाखा २. ------------------------------------------------------------

खाते नंबर व प्रकार ३.------------------------------------------------------------

आयएफएससी कोड ४.------------------------------------------------------------

दिनांक :- / /२०१९

ठिकाण :-

निविदाधारकाची सही व शिक्का



६/१२७

अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/ स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला
उत्पादक संस्थेचा दाखला/तत्सम परवाना
(उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका)

२. GST नोंदणी दाखला/GST Online Registration Acknowledgement

३. पॅन कार्ड

४. २०१५-१६,२०१६-१७ व २०१७-१८ या ३ वर्षाचे सरासरी वार्षिक उलाढालीबाबतचे
चार्टर्ड अकाऊंटन्ट यांचे प्रमाणपत्र

५. अन्न आणि औषध प्रशासन नोंदणी परवाना (FSSAI परवाना)

ब) हिरवी विलायचीचा नमुना स्वतंत्र कापडी पिशवीमध्ये वरच्या बाजुस
मालाचा प्रकार, फर्मचे नांव इ. तपशिलासह स्वाक्षरी करुन सिलबंद असलेले

दिनांक - / /२०१९
ठिकाण -

निविदाधारकाची सही व शिक्का

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– सन २०१९-२० करिता प्रसादालय, लाडू निर्मिती व कॅन्टीन विभागांसाठी हिरवी विलायची पुरविण्याचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या विलायचीचा आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, संस्थानचे गरजेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर विलायचीचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त विलायचीची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही ती मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

मान्य दराने विलायचीचा पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर विलायचीच्या एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख भरणा करु. याकरीता बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत नमुन्याप्रमाणे माल वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०१९
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव सही/सहया व शिक्का

(१) -----------------------------------

(२) -----------------------------------

**सोबत-** कागदपत्रे



८/(७२)

## वार्षीक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ------------------------------------------------ यांचे निविदेसंबंधित व्यवसायाची सन २०१५-१६,२०१६-१७ व २०१७-१८ या आर्थिक वर्षाची उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | वर्ष | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | सन २०१५-१६ | |
| २ | सन २०१६-१७ | |
| ३ | सन २०१७-१८ | |
| | एकुण | |
| | सरासरी वार्षिक उलाढाल | |

दिनांक :- / /२०१९
ठिकाण :-

लेखापरीक्षकाची सही/चार्टर्ड अकाऊंटंट
( नाव/ सही शिक्का)

नोंदणी क्रमांक.

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

BOQ period of supply Aug. 2019 to Mar. 2020

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate Per Quintal | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Green Cardamom (Hirvi Vilayachi) - Bold Dry | 30.00 | Quintal | | |

**(Deepak Muglikar, I.A.S.)**
**CHIEF EXECUTIVE OFFICER**
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

17/7